MHBH050006802021

दाखल तारीखः १६.११.२०२१

नोंदणी तारीखः १६.११.२०२१

निकाल तारीखः ०५.०८.२०२६

**कालावधीः ०४ व. ०८ म. २० दि.**

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी लाखांदुर यांचे न्यायालय
## (पिठासीन अधिकारीः प्रविण पी. यादव)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३७३/२०२१ निशाणी क्र. ९ खाली**

गुन्हा क्रमांक १८९/२०२१ भादवि, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४ प्रमाणे पोलीस स्टेशन लाखांदुर.

**अभियोगपक्ष** : **महाराष्ट्र शासन,**
तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन लाखांदुर,
ता. लाखांदुर, जि. भंडारा.

**सरकार पक्षातर्फे** : सौ. ए. सी. बुराडे, सहा.सरकारी वकिल,

**आरोपी** : **हेमराज हंसाराम गौरी,**
वय ३५ वर्षे, धंदा - मजुरी,
राहणार – बिड सितेपार,
ता. मोहाडी, जि. भंडारा.

**आरोपीतर्फे** : श्री. आर.जे. पिल्लारे, विधीज्ञ.

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २९.०७.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २९.०७.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १६.११.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २७.०१.२०२२ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | १९.१०.२०२२ |
| प्रकरण न्यायानिर्णयाकरीता ठेवली ती तारीख | ०५.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०८.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | निरंक |

न्यायनिर्णय निशाणी क्र. ९ खाली

| अ क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी. आर. पी. सी. प्रमाणे सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेमराज हंसाराम गौरी | २९.०७.२१ सुचनापत्रावर सोडले | १६.११.२१ | भादवि कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मो.वा.का. १९८८ चे कलम १८४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| ०१. | चांगदेव भाऊराव ढोरे, सरकारी साक्षीदार क्र. १ | फिर्यादी |
| ०२. | शकील करीम शेख, सरकारी साक्षीदार क्र. २ | घटनास्थळ व जप्ती पचं |
| ०३. | शैलेश नारायण तलमले, सरकारी साक्षीदार क्र. ३ | जखमी साक्षीदार |
| ०४. | देवचंद चांगो तलमले, सरकारी साक्षीदार क्र. ४ | साक्षीदार |
| ०५. | जगदिश नारायण तलमले, सरकारी साक्षीदार क्र. ५ | साक्षीदार |
| ०६. | अमरदिप प्रभाकर खाडे, सरकारी साक्षीदार क्र. ६ | प्राथमिक तपासीक अधिकारी |
| ०७. | अमोल शिवाजी कोकाटे, सरकारी साक्षीदार क्र. ७ | तपासीक अधिकारी |
| ०८. | डॉ. शिवाणी सुधीर दलाल, सरकारी साक्षीदार क्र. ८ | वैद्यकीय अधिकारी |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायलयातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| ०१ | निशाणी क्र. पी-११ | फिर्याद |
| ०२ | निशाणी क्र. पी-१२ | प्रथम खबर अहवाल |
| ०३ | निशाणी क्र. पी-१३ | साक्षीसमन्स |
| ०४ | निशाणी क्र. पी-१४ | घटनास्थळ पंचनामा |
| ०५ | निशाणी क्र. पी-१५ | जप्ती पंचनामा |
| ०६ | निशाणी क्र. पी-२० | सुचनापत्र |
| ०७ | निशाणी क्र. पी-२१ | जप्ती पंचनामा |
| ०८ | निशाणी क्र. पी-२५ | पत्र |
| ०९ | निशाणी क्र. पी-२६ | रिक्वीझीशन लेटर |
| १० | निशाणी क्र. पी-२७ | एम.एल.सी. |

## बचाव पक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

न्यायलयातर्फे दस्तऐवजांना देण्यात आलेल्या निशाणी क्रमांक

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## गुन्हयात वापरलेली वस्तु

| अनुक्रमांक | वस्तु | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(दि. ०५.०८.२०२६ रोजी घोषित)

**०१.** प्रस्तुतचा खटला आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४ प्रमाणे अन्वये शिक्षापात्र गुन्ह्याकरीता चालविण्यात आला आहे.

**०२.** सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असून त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणासह नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| **१.** | आरोपीने दिनांक २९/०७/२०२१ रोजी १७.४५ ते १७.५० वाजेच्या सुमारास मौजा लाखांदुर, ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा येथील एच.पी. गॅस एजन्सी समोरील सिमेंट रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील बस क्र. एम.एच.-४०/वाय-५५४९ भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून मानवी जिवितास धोका निर्माण केला, ही बाब सरकार पक्षाने सिध्द केली काय? | .. | **नाही.** |
| **२.** | आरोपीने वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी त्याच्या ताब्यातील बस क्र. एम.एच.-४०/वाय-५५४९ ही मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचवण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली व शैलेष नारायण तलमले यांना दुखापत होण्यास कारणीभुत ठरला ही बाब सरकार पक्षाने सिध्द केली काय? | .. | **नाही.** |

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ३. | आरोपीने वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी त्याच्या ताब्यातील बस क्र. एम.एच.-४०/वाय-५५४९ हे मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली व शैलेष नारायण तलमले यांना गंभीर दुखापत होण्यास कारणीभुत ठरला ही बाब सरकार पक्षाने सिध्द केली काय? | .. | **नाही.** |
| ४. | आरोपीने वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी त्याचे ताब्यातील बस क्र. एम.एच.-४०/वाय-५५४९ सार्वजनिक रस्त्यावर इतरांच्या जिवीताला धोका निर्माण होईल अशा धोकादायकपणे चालविली ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली काय? | | **नाही.** |
| ५. | अंतिम आदेश काय ? | .. | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**०३.** सरकार पक्षाचा पुरावा निशाणी क्र.१ वरील दि. २५/०३/२०२६ रोजीचे आदेशानुसार बंद करण्यात आला. आरोपीने त्याच्या वतीने एकही साक्षीदार तपासलेला नाही.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबतः</u>**

**०४.** मुद्दा क्र. १ ते ४ हे एकमेकाशी संबंधीत आहेत. तसेच त्यांच्याबद्दल देण्यात आलेला पुरावा सारखाच असल्याने चारही मुद्दे एकत्र विचारार्थ घेतले आहेत.

**०५.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी चांगदेव भाऊराव ढोरे (सा.क्र. १) यांची साक्ष नोंदवली आहे. फिर्यादी चांगदेव भाऊराव ढोरे (सा.क्र. १) यांनी त्यांच्या पुराव्यात प्रस्तूतची घटना दिनांक २९.०७.२०१९ रोजी एच.पी.गॅस एजन्सी जवळ झाली होती असे कथन केले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, लाखांदूर पोलिसांनी त्यांना ते शैलेशचे मित्र असल्याने बोलावले होते. सदर दिवशी ते व शैलैश हे पेट्रोल पंपाजवळ भेटले. शैलेश व त्यांनी दोघांनीही आपापल्या गाडीमध्ये पेट्रोल भरले. पुढे त्यांनी असे कथन केले की, शैलेश त्याच्या वहिनीला सरकारी दवाखान्यामध्ये डबा देण्यासाठी चालला होता, तेव्हा त्याचा एच.पी. गॅस एजन्सी जवळ बसने अपघात झाला. त्यामुळे त्याचा हात व पाय मुरगळला. तो रस्त्याच्या डाव्या बाजूला पडला होता. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यानंतर तेथे लोकं जमा झाले. पोलीस व ॲम्बुलन्स देखील आली. त्यानंतर शैलेश यास सरकारी दवाखान्यामध्ये घेऊन गेले. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यानंतर ते ९.३० ते ९.४५ च्या दरम्यान लाखांदूर पो.स्टे. ला गेले. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदवले. त्यानंतर त्यांनी फिर्याद नि.क्र. ११ दिली व प्रथम खबर अहवाल नि.क्र. १२ वर आहे. त्यांनी सदरील बसचा चालक हा गौरी हा होता असे कथन केले.

**०६.** फिर्यादी चांगदेव भाऊराव ढोरे (सा.क्र. १) यांनी आरोपीच्या वकिलातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात त्यांनी ज्या वेळेस अपघात

झाला त्या वेळेस ते वाय.सी. कॉलेजच्या थोडे मागे होते असे कथन केले. त्यांनी वाय.सी. कॉलेज ते अपघातस्थळ यामधील अंतर अंदाजे ५०० ते ६०० मिटर असेल असे कथन केले. विचारलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली.

**०७.** फिर्यादी चांगदेव भाऊराव ढोरे (सा.क्र. १) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी ज्या बसने अपघात झाला होता त्या बसचा नोंदणी क्रमांक त्यांच्या पुराव्यामध्ये सांगीतलेला नाही. तसेच बसचालकाने ज्या बसने अपघात झाला होता ती बस हयगयीने व भरधाव वेगाने चालविली असे देखील कथन केले नाही. त्यामुळे फिर्यादी यांच्या पुराव्याद्वारे बस चालकाने म्हणजेच आरोपी हा ज्या बसने अपघात झाला ती बस हयगयीने व भरधाव वेगाने चालवीत होता ही बाब सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभिलेखावर आलेला इतर पुरावा तपासणे आवश्यक आहे.

**०८.** अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यासाठी घटनास्थळ व जप्ती पंच शकील करीम शेख (सा.क्र. २) यांची साक्ष नोंदवलेली आहे. पंच साक्षीदार शकील करीम शेख (सा.क्र. २) यांनी त्यांच्या पुराव्यात लाखांदूर पोलिसांनी त्यांना ठाण्यामध्ये बोलावले होते असे कथन केले. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, ते ट्रॅक्टर घेऊन पेट्रोल पंपावर गेले होते. त्यांनी अपघात झालेली मोटारसायकल त्यांच्या ट्रॅक्टरमध्ये मांडली. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये नेऊन सदरील गाडी त्यांनी ठेवली. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, त्यानंतर पोलिसांनी त्यांची सही घेतली. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १४ त्यांच्यासमक्ष तयार करण्यात आला. तेथे गाडी, वाळू व रक्त जप्त करण्यात आले होते. त्यानंतर जप्ती पंचनामा नि.क्र. १५ तयार करण्यात आला. त्यांच्यासोबत

दोनाडकर नावाचा द्वीतीय पंच होता असे त्यांनी कथन केले. घटनास्थळाच्या चतुःसिमा त्यांना सांगता येणार नाही असे देखील त्यांनी कथन केले.

**०९.** घटनास्थळ व जप्ती पंच नामे शकील करीम शेख (सा.क्र.२) यांनी आरोपीच्या वकिलातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात पोलिसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामे करणेकामी सुचनापत्र दिले नव्हते असे कथन केले. सदर दिवशी पेट्रोल भरण्यासाठी ते ट्रॅक्टर घेऊन गेले होते ही बाब त्यांनी मान्य केली. ते त्या ट्रॅक्टरवर हमाल असल्याने ती गाडी भरण्यासाठी त्यांचा ट्रॅक्टर बोलावला होता ही बाब देखील त्यांनी मान्य केली. अपघातग्रस्त गाडी ही टी.व्ही.एस. कंपनीची होती परंतु तिचा क्रमांक त्यांना आठवत नाही असे त्यांनी कथन केले. पोलीसांनी त्यांच्या कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या, त्या कागदावर वरती दोनचार नावे होती असे देखील त्यांनी कथन केले. विचारलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली.

**१०.** घटनास्थळ व जप्ती पंच नामे शकील करीम शेख (सा.क्र. २) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर पंच साक्षीदार हे पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केल्याचे सांगत आहे. परंतु त्यांनी घटनास्थळाच्या चतुसिमा सांगितलेली नाही. त्याचप्रमाणे अपघातग्रस्त वाहनांचे क्रमांक देखील सांगितलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या पुराव्याआधारे घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही.

**११.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी जखमी साक्षीदार शैलेश नारायण तलमले (सा.क्र. ३) यांची साक्ष नोंदवली आहे. जखमी साक्षीदार शैलेश नारायण तलमले (सा.क्र. ३) यांनी त्यांच्या पुराव्यात घटना

दिनांक २९.०७.२०२१ रोजी लाखांदूर येथील गॅस एजन्सी समोर सायंकाळी साडे पाच वाजता घडली होती असे कथन केले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, ते रुग्णालयात वहिनीकडे डब्बा घेऊन जात होते. पेट्रोल पंपावर त्यांना त्यांचा एक मित्र मिळाला. ते त्याच्याशी बोलले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मग रुग्णालयात येत असतांना त्यांचा अपघात बसने झाला. अपघातामुळे त्याच्या हाताला, पायाला व डोळ्यांना मार लागला होता. हात क्रॅक झाला होता, पायाला जखम झाली होती. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर भंडारा येथील दवाखान्यात नेले. सदरचा अपघात बसमुळे झाला होता. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदवले होते.

**१२.** जखमी साक्षीदार शैलेश नारायण तलमले (सा.क्र. ३) यांनी आरोपीच्या वकिलातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात घटनेच्या वेळेस एकतर्फा रोड चालू होता असे कथन केले. घटना घडली त्यावेळेस वडसाकडे जातांना डाव्या बाजूचा रस्ता बंद होता व उजवी कडचा चालू होता ही बाब त्यांनी मान्य केली. त्यांची गाडी बसला मागे लागली ही बाब त्यांनी नाकारली. त्यांनी स्वतःहून सांगीतले की त्यांची गाडी बसच्या गेटला लागली. त्यांची आमने-सामने धडक झाली नाही ही बाब त्यांनी मान्य केली. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांच्या गाडीचा क्रमांक त्यांना माहित नाही. बसचा क्रमांकही माहित नाही. आरोपीसही त्यांनी पाहिले नाही. त्यांचे बयाण त्यांनी वाचून पाहिले नाही. पोलिसांनी त्यांचे बयाण वाचून दाखवले नाही. त्यामुळे त्यांच्या बयाणात काय लिहिले हे त्यांना माहित नाही ही बाब त्यांनी मान्य केली. त्यांच्या डोळ्याची जी टीक आहे ती जन्मापासून आहे ही बाब देखील त्यांनी मान्य केली. विचारलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली.

**१३.** जखमी साक्षीदार शैलेश नारायण तलमले (सा.क्र. ३) यांच्या

पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदार हा जखमी साक्षीदार होता व त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष आरोपीविरुध्द ठेवलेला गुन्हा करण्यासाठी अत्यंत महत्वाचा होता. परंतु सदर साक्षीदाराने आरोपीला ओळखले नाही. बसचा क्रमांक देखील सांगितलेला नाही. त्याचप्रमाणे आरोपीने बस ही हयगयीने व भरधाव वेगाने चालविली होती असे देखील कथन केले नाही. याउलट असे मान्य केले आहे की घटनेच्या वेळेस फक्त एकतर्फीच रोड चालू होता. वडसा कडे जातांना डाव्या बाजुचा रस्ता बंद होता व उजवीकडचा रस्ता चालू होता. म्हणजेच घटनेच्या वेळी रस्त्याचे बांधकाम चालू होते. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या पुराव्याआधारे देखील आरोपी हा त्याच्या ताब्यातील बस ही हयगयीने व भरधाव वेगाने चालवीत होता ही बाब सिध्द होत नाही.

**१४.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी देवचंद चांगो तलमले (सा.क्र. ४) यांची साक्ष नोंदवली आहे. साक्षीदार देवचंद चांगो तलमले (सा.क्र. ४) यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी हेमराज गौरी यांना ते ओळखत नाही असे कथन केले. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, फिर्यादी चांगदेव ढोरे व जखमी शैलेश तलमले यांना ते ओळखतात. घटना दिनांक २९.०७.२०२१ रोजी गॅस एजन्सीजवळ ५.५० मिनीटांनी सायंकाळी घडली होती. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, त्या वेळेस ते कृषी केंद्रावर खात घेण्यासाठी चालले होते. तेथे बस व लोकं होते त्यामुळे ते बघण्यास गेले. तेव्हा पडलेला शैलेश दिसला. मग त्यास दवाखान्यात नेले. त्याच्या हाताला लागले होते. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतची घटना कशी झाली, कशामुळे झाली याबाबत त्यांना माहित नाही. प्रस्तुतची घटना बसमुळे झाली होती व तेथे बसही थांबली होती. शैलेश यास ग्रामीण रुग्णालय लाखांदूर येथे नेले. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, त्यानंतर त्याचा भाऊ जगदिश

नारायण तलमले तेथे आला. त्याने त्यास भंडाऱ्याला नेले. घटनास्थळावर त्यांनी शैलश पडला होता व टी.व्ही.एस. गाडी असल्याचे पाहिले. पोलिसांनी त्यांना दि. ३१ रोजी लाखांदूर पोलीस स्टेशन येथे विचारपूस केली होती.

**१५.** साक्षीदार देवचंद चांगो तलमले (सा.क्र. ४) यांनी आरोपीच्या वकिलातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात प्रस्तुतची घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली नाही ही बाब मान्य केली. या घटनेबाबत त्यांना लोकांनी सांगितले म्हणुन माहित आहे ही बाब देखील त्यांनी मान्य केली.

**१६.** साक्षीदार देवचंद चांगो तलमले (सा.क्र. ४) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदार हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा देखील आरोपीविरुध्द ठेवलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी उपयोगी ठरु शकत नाही.

**१७.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार जगदिश नारायण तलमले (सा.क्र. ५) यांची साक्ष नोंदवली आहे. साक्षीदार जगदिश नारायण तलमले (सा.क्र. ५) यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी हेमराज गौरी यास ते ओळखत नाही असे कथन केले. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, फिर्यादी चांगदेव ढोरे यास ते ओळखतात. घटना दिनांक २९.०७.२०२१ रोजी लाखांदूर येथील गॅस एजन्सी जवळ अंदाजे सायंकाळी पाच ते साडेपाचच्या दरम्यान घडली होती. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांची वहिनी विभा मुकूंदा तलमले ही सरकारी दवाखाना लाखांदूर येथे भर्ती असल्याने ते तिला डब्बा देण्यासाठी चालले होते. बस साकोलीहून वडसाकडे चालली होती. तेव्हा समोरुन टुव्हीलरला धडक मारली. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, ते गावीच होते. त्यांना लगेच फोन लावला त्यानंतर ते सरळ

भंडारा येथील दवाखान्यामध्ये गेले. पोलीसांनी त्यांचे बयाण घेतले होते.

**१८.** साक्षीदार जगदिश नारायण तलमले (सा.क्र. ५) यांनी आरोपीच्या वकिलातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात सदर घटना त्यांनी स्वतः पाहिली नाही ही बाब मान्य केली. फिर्यादी त्यांचा भाऊ लागतो असे त्यांनी कथन केले.

**१९.** साक्षीदार जगदिश नारायण तलमले (सा.क्र. ५) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदार हा देखील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा देखील आरोपीविरुध्द ठेवलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी उपयोगी ठरु शकत नाही.

**२०.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी प्राथमिक तपासी अधिकारी सहा.पो.निरीक्षक अमरदिप प्रभाकर खाडे (सा.क्र. ६) यांची साक्ष नोंदवली आहे. प्राथमिक तपासी अधिकारी सहा.पो.निरीक्षक अमरदिप प्रभाकर खाडे (सा.क्र. ६) यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी हेमराज गौरी यास ते ओळखतात व फिर्यादी चांगदेव ढोरे यासही ते ओळखतात असे कथन केले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २९.०७.२०२१ रोजी ते लाखांदुर पो.स्टे. येथे पो.उप.निरीक्षक म्हणून कार्यरत होते. सदर दिवशी त्यांची डी.ओ. ड्युटीवर नियुक्ती होती. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वडसा ते साकोली रोडवर अपघात झाल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर ते घटनास्थळी पोहोचले. तेथे एका बसचा व दुचाकीचा अपघात झाला होता. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दुचाकीवरील अपघातग्रस्त शैलेश तलमले यांना अगोदरच दवाखान्यात रवाना केल्याची माहिती चांगदेव ढोरे यांनी त्यांना दिली. तेव्हा सदर ठिकाणी हजर असलेले शकीन करीम शेख व राजेंद्र मारोती दोनाडकर यांना घटनास्थळ पंचनाम्याला पंच म्हणून हजर राहण्याकरीता

सुचनापत्र नि.क्र. २० दिले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, चांगदेव ढोरे यांच्या दाखवण्याप्रमाणे पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला. मोक्यावर दुचाकी क्रमांक एम.एच.३१-बी.क्यु.४५४९ ही अपघातग्रस्त होऊन रोडच्या डाव्या बाजुला पडल्याचे त्यांना दिसून आले. तसेच रोडवर रक्त सांडल्याचेही त्यांना दिसून आले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, बस क्र. ४०-वाय-५५४९ जिच्यावर तुमसर ते गडचिरोली अशी पाटी होती, सदर बसकडे बोटाने दर्शवून फिर्यादी यांनी 'या बसच्या चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने त्याच्या ताब्यातील बसने मो.सा.क्र. एम.एच.३१-बी.क्यु.४५४९ चा चालक शैलेश तलमले यास धडक देऊन जखमी केले व ते घटनास्थळ हेच आहे' असे सांगीतले. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, घटनास्थळावर पडलेले रक्त व रक्त मिश्रीत माती पंचांसमक्ष जप्त करण्यात आली. घटनास्थळाच्या चतुसिमा नोंदवण्यात आल्या. मोक्यावर घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १४ तयार करुन १८.१० वाजता सुरु करुन १८.५० वाजता संपवण्यात आला. त्यांनी जप्ती पंचनामा नि.क्र. २१ वरील त्यांची सही ओळखली, त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगीतले. पुढील तपास पुंडलिक मस्के साहेबांनी केला असे देखील त्यांनी कथन केले.

**२१.** प्राथमिक तपासी अधिकारी सहा.पो.निरीक्षक अमरदिप प्रभाकर खाडे (सा.क्र. ६) यांनी आरोपीच्या वकिलातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात घटनास्थळ पंचनामा जेथे तयार करण्यात आला तो सिमेंट रोड आहे ही बाब त्यांनी मान्य केली. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १४ मधील वाक्य “घटनास्थळी उभ्या असलेल्या बसचे निरीक्षण केले असता बसच्या वाहकाकडील दरवाज्याला मोटार सायकल घासल्याचे निशान दिसत आहे हा वाचून दाखविला” हा मजकुर बरोबर असल्याचे त्यांनी कथन केले. विचारलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली.

**२२.** प्राथमिक तपासी अधिकारी सहा.पो.निरीक्षक अमरदिप प्रभाकर खाडे (सा.क्र. ६) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तपासीक अंमलदार यांच्या पुराव्याआधारे अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्तीपंचनामा सिध्द केला आहे. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १४ वर आहे. घटनास्थळ पंचनामा हा परिस्थितीजन्य पुरावा आहे. घटनास्थळ पंचनाम्याच्या आधारे अपघात ग्रस्त वाहन हे भरधाव वेगाने होते ही बाब सिध्द होऊ शकते. परंतु घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता घटनास्थळ पंचनाम्यामध्ये घटनास्थळी बसचे टायरचे निशान वगैरे आढळून आल्याचे पंचनाम्यामध्ये नमूद नाही. म्हणजेच अपघात ग्रस्त वाहन भरधाव वेगात होते ही बाब पंचनाम्याआधारे सिध्द होऊ शकली नाही.

**२३.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी तपासी अधिकारी पो.उप.नि. अमोल शिवाजी कोकाटे (सा.क्र. ७) यांची साक्ष नोंदवली आहे. तपासी अधिकारी पो.उप.नि. अमोल शिवाजी कोकाटे (सा.क्र. ७) यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी हेमराज गौरी यास ते ओळखतात असे कथन केले. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत गुन्ह्याचा अपराध क्र. १८९/२०२१ असा असून तो भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८ सहकलम १८४ मो.वा.का. अंतर्गतचा आहे. या गुन्ह्यामध्ये त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक खाडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंडलीक मस्के यांनी केला आहे. प्रस्तुत दोषारोपत्र पत्र त्यांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये दाखल केलेले आहे.

**२४.** तपासी अधिकारी पो.उप.नि. अमोल शिवाजी कोकाटे (सा.क्र. ७) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदार यांचा पुरावा औपचारिक स्वरुपाचा आहे. त्यांनी फक्त न्यायालयात

दोषारोप सादर केलेला आहे.

**२५.** अभियोग पक्षाने जखमी शैलेश तलमले यांच्या जखमा सिध्द करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी सुधीर दलाल (सा.क्र. ८) यांची साक्ष नोंदवली आहे. अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी सुधीर दलाल (सा.क्र. ८) यांच्या पुराव्याआधारे जखमी शैलेश तलमले यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र. २७ सिध्द केले आहे. त्यामुळे जखमी शैलेश तलमले यांना जखमा झाल्या होत्या ही बाब सिध्द होत आहे.

**२६.** एकंदरीत सरकार पक्षातर्फे अभिलेखावर आलेल्या फिर्यादी चांगदेव भाऊराव ढोरे (सा.क्र. १) व जखमी साक्षीदार शैलेश नारायण तलमले (सा.क्र. ३) यांचा पुरावा आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अत्यंत महत्वाचा होता. परंतु वरील साक्षीदारांनी आरोपीने त्याच्या ताब्यातील बस हयगयीने व भरधाव वेगाने चालविली असे सांगितलेले नाही. त्यामुळे घटनेच्या वेळी आरोपी हा अपघातग्रस्त बस भरधाव वेगाने चालवीत होता ही बाब सिध्द झाली नाही. भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालविली ही बाब सिध्द करणे आवश्यक असते. परंतु अभिलेखावर आलेल्या पुराव्याआधारे अभियोग पक्ष असे सिध्द करु शकला नाही की, आरोपीने त्याच्या ताब्यातील बस ही हयगयीने व निष्काळजीपणे चालविली. त्यामुळे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ चे महत्वपुर्ण घटक सिध्द झालेले नाही. त्यामुळे **मुद्दा क्रमांक १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबतः</u>**

**२७.** मी ह्यापूर्वीच आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होऊ शकलेला नाही असे निरिक्षण नोंदविले आहे. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरिल सर्व विवेचनानंतर मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** आरोपी **हेमराज हंसाराम गौरी** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जुने जामीनपत्र व बंधपत्र हे भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ कलम ४८१ प्रमाणे पुढील ६ महीन्यांकरीता कार्यान्वीत असतील व त्यानंतर ते रद्द समजले जाईल.

**३.** प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायासनासमोर जाहीर.

Digitally signed by PRAVIN PRABHULAL YADAV
Date: 2026.08.05 17:44:04 +0530

लाखांदुर.

दि. ०५.०८.२०२६.

**(प्रविण पी. यादव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखांदुर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | H.R. Puri |
| Name of the Court | : | J.M.F.C., Lakhandur. |
| Date of Judgment | : | 05/08/2026 |
| Judgment Signed By P.O. | : | 05/08/2026 |
| Judgment Upload on | : | 05/08/2026 |